# उगवता सूरज

**डॉ. सूरज एंगडे** मानवाधिकार कार्यकर्ते, संशोधक, विचारवंत, आणि लेखक आहेत. त्यांचे जातीव्यवस्थेवरील विचार परखड असून 'कास्ट मॅटर्स' हे पुस्तक जगभर गाजत आहे. मोठ्या संघर्षातून घडलेल्या या दलित स्कॉलरने 'ग्लोबली' आपली ओळख प्रस्थापित केली आहे. जगभरातील तरुणांसाठी ते 'आयकॉन' बनले आहेत. नांदेड ते हॉर्वर्ड, ऑक्सफर्ड असा त्यांचा खूप मोठा प्रवास आहे. एकांगी विचारांतून प्रगती होत नसते, असे सांगणारे डॉ. एंगडे यांची हिंदुस्थान आणि जगभर भ्रमंती सुरू आहे. जातीभेद, पितृसत्ताक व्यवस्थेचा कमकुवतपणा, असंघटितांचे प्रश्न अशा अनेक मुद्द्यांवर ते सडेतोड व्याख्याने देतात.







डॉ. राजेंद्र गोणारकर
rajendra.gonarkar@rediffmail.com

**नांदेडचं एक आंबेडकर नगर ते हार्वर्ड, ऑक्सफर्ड ही खूप मोठी यात्रा आहे. घरची अभावग्रस्तता, त्यात वडिलांचं आजारपण या सगळ्या गोष्टी पाहता तुला कसं वाटलं की, आपण हार्वर्डला पोहोचू शकतो?**

मला कधी वाटलं नाही की, मी कधी परदेशात वगैरे जाईन म्हणून. आमच्याकडे एकेकाळी एक पोरगा परदेशात गेलेला. तो चीनला गेला होता. फॉरेन रिटर्न म्हणजे आपल्याकडे एक स्टार. तर तेव्हा तो आमचा स्टार होता. तेवढंच मला माहीत होतं. आपली शिक्षण पद्धती सामंती आहे. पाठांतराला आपल्याकडे फार महत्त्व आहे. म्हणजे ज्याची स्मरणशक्ती चांगली तो हुशार. कार्यकारणभाव, आकलन याला दुय्यम स्थान. मला हे आवडायचं नाही. परीक्षेत मी माझी स्वतःची उत्तरं स्वतःच तयार करत असे. मी एलएलबी फायनल इयरला मेरिट लिस्टमध्ये आलो. पुढील शिक्षणासाठी मी मुंबई विद्यापीठात प्रवेश घेतला. तिथं मी एन्व्हायर्नमेंट लॉ घेतला होता. सगळ्यात जास्त मार्क असलेला, पण सगळ्यात लिस्ट प्रिफर्ड कोर्स घेणारा असा मी विद्यार्थी होतो, पण खरं सांगू का? काहीच माहीत नसतं. बर्मिंगहॅम काय, लंडन काय? लंडन आणि इंग्लंड मला एकच वाटे. त्या सगळ्या शहरांची फक्त इंटरनेटवर माहिती घेतली. तिथं इंटरनॅशनल ह्युमन राईट लॉ असा कोर्स होता. मग मी ठरवलं, इंग्लंडला जायचं आणि मग ती हिंमत केली. पहिली अडचण पैशांची होती. पैसे नसणं हीच सगळ्यात मोठी भीती असते. त्या असलेल्या मर्यादेला तुम्ही आव्हान देता, मीही तेच केलं आणि गेलो.

**अगदी तरुण वयात तू इंग्लंडला गेलास. या नव्या ठिकाणचा तुझा अनुभव कसा होता? आपलेपणा, परकेपणा जाणवला का ?**

तुम्हाला जर पाचव्या पायरीवर जायचं असेल तर आधी चार पायऱ्या चढून जावं लागतं. मी पहिल्या पायरीवरून थेट पाचव्या पायरीवर गेलो. त्यामुळे कळलं नाही की, बाकीच्या पायऱ्यांचे अनुभव काय असतात. मी एकदम इंग्लंडसारख्या देशात गेलो. २ फेब्रुवारी २०११ ला बर्मिंगहॅम या शहरात उतरलो. मग मला सांगण्यात आलेल्या पत्त्यावर टॅक्सीने गेलो, पण टॅक्सीतून उतरल्यावर मी एकदम गांगरून गेलो. कुठे आलो मी? कोणीच ओळखीचं नाही, काहीच नाही. एकदम जीव कासावीस होऊ लागला. त्या परत जाणाऱ्या टॅक्सीच्या मागे धावत सुटलो.

महाराष्ट्र शासन शेड्यूल्ड कास्टस् विद्यार्थ्यांना देतात, त्याच स्कॉलरशिपचा मी लाभार्थी आहे. ती स्कॉलरशिप दिल्यामुळे मला त्या प्रांगणात, त्यांच्या हॉस्टेलमध्ये राहायला मिळालं. माझ्या रूममध्ये अजून दोघे होते. एक होता सायप्रसचा म्हणजे तुर्की आणि ग्रीक यांच्यामध्ये एक बेट आहे तिथला, दुसरा होता इटलीचा. ते एक्स्चेंज प्रोग्रॅममधून आले होते. हिंदुस्थानी मित्रांचा शोध घेत

असताना दोन जण भेटले. एक होता गुजरातचा ब्राह्मण आणि दुसरा मुंबईच्या उल्हासनगरचा सिंधी. मी स्कॉलरशिपवाला होतो. माझ्याकडे पैसे नसत. नांदेडमधील चळवळीतील लोकांनी मला जाताना २२ हजार रुपये दिले होते. हे २५० पौंड कसे जपावेत? बर्गरची किंमत होती ५ पौंड. मी हिशेब लावला. दिवसातून दोन खाल्ले तर १० पौंड आणि एक महिना लागेल म्हणजे ३०० पौंड! एवढे तर पैसे नाहीत. आता कसं होईल? खाण्याच्या बाबतीत विशेष चिंता, पण हिंदुस्थानी मित्र रूमवर जेवण बनवायचे. त्यामुळे थोडी चिंता मिटली होती.

आम्ही सोबत फिरत असू. शॉपिंग करणं वगैरे गोष्टी केल्या. ब्राह्मण जो होता त्याच्या दीव, दमण येथे कंपन्या होत्या. जो सिंधी होता, त्याच्या वडिलांचे थायलंड, नेपाळ वगैरे ठिकाणी चार-पाच हॉटेल होते. हे सगळे पैसेवाले, पण जात आडवी आली.

**तुला असं का वाटलं की, जात आडवी आली?**

आमच्याकडे इंटरनॅशनल ह्युमन राईटचे क्लास प्रेझेंटेशन्स असत. विषय दिले जातात, त्यात कायद्यांविषयी बोलावं लागे. या वर्गामध्ये याचाच भाग म्हणून मी हिंदुस्थानातील दलितविरोधी अत्याचारांबाबत मांडणी करणारा निबंध सादर केला. तिथे उपस्थित एका पंजाबी मुलीला तो निबंध आवडला नाही. खरं तर तिला वाईट वाटायला नको होतं, पण तिनं ते मनावर घेतलं. त्या वेळी मी बाबासाहेब आंबेडकर जयंती, आंबेडकरी आंदोलन यावर फेसबुकवर पोस्ट लिहीत असे. तेही तेथील हिंदुस्थानी मित्रांना आवडलं नाही. एके दिवशी मला घेऊन गेले घरी. अतिशय तणावाचं वातावरण, अतिशय सेन्सिटिव्ह. मग सिंधी धमकावत बोलला, ''तू असं का लिहितोस?'' मला जाणीव झाली, कुछ तो गडबड है, गलत है. यांचा काही तरी प्लॅन ठरलेला आहे... आणि मग तो सिंधी पोरगा बोलायला लागला. तो म्हणायला लागला की, तू ब्राह्मणांच्या विरोधात असं का करतोस? तुम्ही आरक्षण घेतलं, ब्राम्हण चांगला समाज आहे. त्यांनी कुणाचं बिघडवलं नाही वगैरे वगैरे. माझ्या निबंधातील खैरलांजीचा उल्लेख करत तो म्हणाला, 'सुरेखा भोतमांगेचा बलात्कार, खून झाला यात व्यवस्थेचा दोष नाहीच. सुरेखा भोतमांगे एक बदफैली बाई होती.' ते मला मग खूपच लागलं. ते माझे जवळचे मित्र होते, पण ते हे सगळं बोलत होते.

**तुझा हा जो अनुभव आहे, त्याच्यातून 'कास्ट मॅटर्स' या नावाचं अत्यंत महत्त्वाचं जगभर गाजणारं पुस्तक तयार झालं. हे पुस्तक लिहिण्यामागची काय प्रेरणा होती?**

हार्वर्डला घर ते विद्यापीठ असा बसमधून प्रवास करताना माझ्या मनात असं पुस्तक लिहिण्याचा विचार पहिल्यांदा आला. मला वाटलं की, आपण लिहिले पाहिजे. माझ्या मित्राला सांगितलं, मला पुस्तक लिहायचे आहे...'कास्ट' या विषयावर. हा नवीन विषय होता. कारण माझी पीएच.डी. 'जात' या विषयावर नव्हती, पण आवड होती. या संबंधाने खूप वाचलं होतं. सामाजिक प्रश्न, डॉ. बाबासाहेबांचे विचार यावर मी लेखनही करत असे, पण माझा विषय लॉ होता. नंतर मग मी सामाजिक शास्त्रे या विषयावर लिहिण्याचा विचार केला. हार्वर्ड विद्यापीठात एका फेलोशिपसाठी प्रपोजल दिलं. मला फेलोशिप मिळाली. डूकव्हाईस या तेथील विचारवंताच्या नावाने ही फेलोशिप होती. पुस्तकाचे एक अतिशय काटेकोर ॲकॅडमिक लेखन मी केले आणि प्रकाशकाला पाठवलं. प्रकाशकांनी सांगितलं की, एवढा महत्त्वाचा मुद्दा तू जर एवढ्या अवघड भाषेत लिहिशील तर ते इथल्या लोकांपर्यंत ते पोहोचण्यास वेळ लागेल. तुझी पुस्तके केवळ लायब्ररीच्या रकान्यात राहतील किंवा संशोधकांपुरती मर्यादित राहतील. माझ्या हार्वर्डच्या मेंटरनी तसंच एक - दोन मित्रांनी सांगितलं की, ते म्हणतात ते बरोबर आहे. मला वाटायचं की, मला माझ्या ॲकॅडमिक मेरिटनुसार तपासा. मी दलित आहे, माझ्या या वेदना आहेत असे सांत्वन देऊन तुम्ही माझं कौतुक करू नका! पण मग मी त्यांचं ऐकलं. नांदेडचे अनुभवदेखील मी त्यात मांडले. ते सगळं वाचकांना आवडलं. पुस्तक हिट झालं.

**यात जो करुणेचा मुद्दा आहे, त्याची खूप चर्चा होते तो नेमका काय आहे?**

व्यवस्था आणि देश या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. देशाच्या अगोदरही एक व्यवस्था असते. त्या व्यवस्थेमध्ये अनेक द्वंद्व आहेत, अनेक भांडणे आहेत, अनेक तऱ्हेचे द्वेष आहेत, अनेक फरक आहेत. व्यवस्थेच्या पुढे जायचं असले तरी त्या व्यवस्थेतून जावं लागत असतं. त्या व्यवस्थेतून जात असताना तुम्हाला अनेक गोष्टी दिसतात... धर्म, पंथ, खान-पान, बोलणं, ओळख, दिसणं, भाषा, सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक सगळ्या गोष्टी आल्या. तर एवढ्या जुन्या हिंदुस्थानच्या व्यवस्थेमध्ये जी हिंदुस्थानची एक संस्कृती आहे, सिव्हिलायझेशन आहे, ते टाळता येत नाही. मग तिथे अस्पृश्य आहेत. हे लहानसहान गावापुरते नाही. ही टॉप टू बॉटम आहे. अस्पृश्यतेचे प्रकार वेगळे असतील, फॉर्म्स वेगळे असतील, नियम वेगळे असतील, पण अस्पृश्य आहेच. अस्पृश्य म्हणजे काय? केवळ स्पर्श नको असलेले असे नाही. अस्पृश्य म्हणजे गाडीबाहेरचे. त्यांनी गाडी ढकलायची. अस्पृश्यांमध्ये आत्मसन्मान रुजू द्यायचा नाही, पिढ्यान्‌पिढ्या त्यांच्यात तसाच न्यूनगंड राहावा, त्यांची क्षमता त्यांना कळू द्यायची नाही तसेच त्यांना त्यांच्या अस्तित्वाची जाणीव होऊ द्यायची नाही, अशी सगळी रणनीती (धार्मिक पुस्तकातून असेल वा आध्यात्मिक रूपाने वा प्रार्थनेतून असेल) तयार केली गेली.

पण मी विचार केला की, एवढी हजारो वर्षं ते बाहेर असलेले लोक हे का सहन करत राहिले? त्याचं कारण असं

की, हे जे बाहेर ढकलून दिलेले लोक आहेत आहेत, त्यांना आत बसलेल्यांबद्दल करुणा आहे. आम्ही माणसं आहोत आणि तीही माणसं आहेत. त्यांनी जरी आम्हाला उपमानव घोषित केलं असलं तरी आम्ही त्यांना तसं का घोषित करावं? त्यांच्यातदेखील एक हृदय आहे, मेंदू आहे. त्यांच्यातही करुणा असू शकते. प्रेम आणि प्रेमासोबत आलेली करुणा ही इथल्या अस्पृश्य असलेल्या समाजाचा इतिहासकालीन वारसा आहे आणि तो वारसा ते कधी विसरलेले नाहीत. आजही करुणेच्या जोरावर नवीन जग स्थापन करण्याची जिद्द ते बाळगून आहेत

आज कुठलेही दलित आंदोलन पहा. तुम्हाला तिथे करुणेचा एक बगिचा दिसेल. दलितांनी जर प्रेम आणि करुणा सोडून दिली तर देशामध्ये रोज एक नागरी युद्ध होईल. नागरी युद्धामुळे आफ्रिका बघा, अमेरिका बघा, देश तुटलेले आहेत. इथल्या दलित समाजाने त्यांच्या रक्तात असलेले प्रेम आणि करुणेचे बीज खुडले असते तर हिंदुस्थान अनेक तुकड्यांमध्ये विभागून राख झाला असता.

**▮जाती केवळ हिंदुस्थानात आहेत असं मानलं जातं, पण तू तर म्हणतोस की, जात ही वैश्विक आहे हे कसे?**

जात ही आपल्याकडे रोजचा अनुभव आहे. दमनाचा इतका दीर्घकाळ असल्यामुळे आपल्याला तसं वाटतं, परंतु हे पूर्णसत्य नाही. आपला जो जातीचा अनुभव आहे त्याला एका एका संदर्भामध्ये समजून घेतलं पाहिजे. त्यामुळे यात अजिबात शंका नाही की, असे दमन हे स्वाभाविकपणे सर्वत्र दिसते.

स्वीडनमधल्या जाती, अमेरिकेतल्या जाती, आफ्रिकेतल्या जाती यांच्याबद्दल तुम्ही काय म्हणणार? बाबासाहेबांनी त्यांच्या लेखनात जातीची मांडणी केली. त्यांच्या पुस्तकाचे शीर्षकच 'भारतातील जाती' असं होतं, तर बाबासाहेबांनी हिंदुस्थानातील जातींबद्दल बोलणं स्वाभाविक आहे. बाबासाहेबांचा फोकस हिंदुस्थान आहे आणि जर तुम्ही त्यांना जबरदस्तीने जगाच्या फोकसमध्ये घेऊन जात असाल तर तसे वाटू शकते, पण जातीआधारित शोषण जगात अनेक ठिकाणी आहे यात दुमत असू नये.

**▮हिंदुस्थानातून परदेशामध्ये शिकायला जाणारे अनेक स्कॉलर असतात, आहेत; परंतु तू नुसता एक स्कॉलर नाही. तू समाजामध्ये मिसळतो, सर्वांची चर्चा करतोस, कारण?**

दोन कारणं आहेत, मी आधीच कार्यकर्ता होतो. भांडण्याचा, आंदोलन करण्याचा पाया मला होताच. वयाच्या एकोणिसाव्या वर्षी मी कॉलेजचा जनरल सेक्रेटरी झालो. दुसरं असं की, माझे वडील चळवळीत होते. चळवळ ही कशी केली पाहिजे, हे मी त्यांच्याकडून शिकलो. रस्त्यावरचा संघर्ष पाहिजे, पण रस्त्यावर न उतरताही अनेक गोष्टी करता येतात हे मी शिकलो. समाजाचं आपण काहीतरी देणं लागतो हे खूप आधीपासून स्पष्ट होतं.

हार्वर्डला आल्यावर मी पाहिलं की, बड्या कंपनीत नोकरी केली तर खूप पैसे मिळतील. पैसे मिळवावेत, मग परत जाऊन समाजात काम करावे, पण त्या जगात गेल्यावर परत येण्याची शाश्वती वाटत नव्हती. मग मी पर्याय निवडला नाही. इकडे पैसे कमी मिळतील, संघर्षदेखील सतत करावा लागेल, पण हाच पर्याय मी निवडला. आत्मविश्वासाच्या दोऱ्या मजबूत करून मी निर्णय घेतला. माझ्या समाजाचं मला बनवण्यात प्रत्यक्ष अप्रत्यक्ष खूप मोठं योगदान आहे. या मोठेपणाचा समाजाला कसा उपयोग करून देता येईल हीच प्रेरणा राहिली माझ्या सक्रिय सामाजिक जगण्याची.

**▮तू स्वत:ला दलित स्कॉलर म्हणवून घेतोस, पण अनेकांचा 'दलित' या शब्दालाच आक्षेप आहे. धर्मांतर केल्यामुळे आता आम्ही दलित नाही, असं त्यांचं म्हणणं आहे...**

हो, त्यांचं म्हणणं मान्य केलं तरी त्यात एक नकारात्मकता आहे असं मला वाटतं. अमेरिकेतील कृष्णवर्णीय माल्कम एक्स याने म्हटलं होतं की, गोरे लोक मला सन्मान देतात, पण तेवढं पुरेसं नाही. जोपर्यंत इथल्या शेवटच्या माणसाला ते सन्मान देणार नाहीत, तोपर्यंत माझ्या सन्मानाला अर्थ नाही. मला तीच भूमिका पटते. जोपर्यंत इथं अखेरची दलित व्यक्ती आहे, तोपर्यंत मीही दलित आहे. समाजातील एक जरी व्यक्ती दलित असेल तर त्या व्यक्तीचं प्रतिनिधित्व करायला हवं. मी स्कॉलर असलो तरी या सर्व उपेक्षितांशी माझी बांधिलकी आहे. त्या लोकांसाठी मला काम करायचं आहे. त्यांनाही वाटलं पाहिजे की, हा माझा माणूस आहे. माझ्या आचरणाने या गरीब व्यक्तींमध्ये आत्मविश्वास निर्माण होत असेल तर मी तसं करतच राहणार आहे. जर कुणाला दलित म्हणवून घेणं आवडत नसेल तर म्हणू नका. मला मात्र दलित स्कॉलर म्हणवून घेण्यात वावगं वाटत नाही.

**▮तू जगभर फिरत असतोस. तू अनेक मान्यवर व्यक्तींच्या सहवासात आलास. अशाच एखाद्या भेटलेल्या व्यक्तींबद्दल काही सांगशील...**

अमर्त्य सेन हार्वर्डला प्राध्यापक असताना त्यांच्या वर्गात मला बसायला मिळालं. ते कॅन्सरने आजारी असतानाही शिकवत असत. सेन सरांना मी माझं 'कास्ट मॅटर्स' हे पुस्तक दिलं. काय आश्चर्य! २०२० साली नवीन वर्षाच्या निमित्ताने 'न्यूयॉर्क टाइम्स' वर्तमानपत्रात अमर्त्य सेन यांना दहा प्रश्न विचारले. त्यात एक प्रश्न असा होता की, असं एक पुस्तक सांगा की, ज्या पुस्तकाच्या वाचनामुळे लेखकाच्या व त्या विषयाच्या जवळ गेलात. तेव्हा त्यांनी सांगितलं, सूरज एंगडे यांचं 'कास्ट मॅटर्स'! अजून काय हवं?

**▮कांशीराम यांचा तू अनेकदा उल्लेख करतोस, पण**

**बाबासाहेब म्हणाले होते, ''जाती तोडा.'' कांशीराम म्हणाले, ''जाती जोडा.'' हा विरोधाभास नाही का ?**

निवडणुकांचं राजकारण हे वेगळं आहे आणि जातीअंत हा वेगळा मुद्दा आहे. कांशीराम यांचा 'जाती जोडो' हे म्हणणं राजकीय आहे. त्यांनी बहुजन ही संकल्पना वापरली. ही सेक्युलर संकल्पना आहे. कांशीराम यांनी जातीय संघटन बनविलं नाही. त्यांनी अनेक जातींना एकत्र करून व्यवस्था परिवर्तनासाठीचं संघटन उभं केलं. त्यांनी वेगवेगळ्या जातसमूहाच्या नायक-नायिका उभ्या केल्या. छोट्या छोट्या समूहांना नेतृत्व दिलं. आज हिंदुस्थानमध्ये ओबीसी, एससी, एसटी हा वर्ग राजकीय बनलेला दिसतो. याचा उगम कांशीरामजींच्या राजकीय चळवळीत आहे.

कम्युनिस्ट पार्टीला डी. राजाला जनरल सेक्रेटरी करावं लागलं. काँग्रेससारख्या एका बड्या पक्षालादेखील अनुसूचित जातीच्या मल्लिकार्जुन खरगेंना काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष करावं लागलं. तसं पाहिलं तर भाजपमध्ये ओबीसींना तरी कुठे स्थान होतं! पण त्यांनीदेखील नरेंद्र मोदींना पंतप्रधान केलं. हे वेगळ्या अर्थाने कांशीरामजी यांच्या चळवळीचं यश आहे.

**आपला समाज एकोणिसाव्या शतकापासून स्त्रियांच्या मुक्तीचा विचार करतो आहे, पण अशा या स्त्रियांची आजची स्थिती काय आहे ?**

ओशो म्हणतो, स्त्री ही सर्वात जास्त स्ट्राँग जेंडर आहे. या पितृसत्ताक व्यवस्थेला स्वत:चा कमकुवतपणा ठाऊक आहे. त्यामुळे स्त्रियांशी स्पर्धा करण्याऐवजी तो स्त्रियांची खोटी प्रतिमा उभी करतो. आपली स्त्रियांसोबत जिंकण्याची क्षमता नाही ना! मग असं करा की, त्यांना व्यवस्थेच्या माध्यमातून मानसिक दृष्टीने मारून टाका. स्त्री कमजोर आहे, कमी बुद्धीची आहे, अबला आहे असं समाजाच्या मनावर बिंबवा. नवीन जिवाला जन्म देण्याच्या क्षमतेपुरते तिला मर्यादित करा. कुठल्याही जातीची स्त्री असो, तिच्यावर अन्यायच झाला आहे, पण खरं हे आहे की, स्त्री हीच बदलाची मोठी वाहक आहे. जर तुम्ही तुमच्या मुलांनाही सांगितलं की, स्त्री खूप स्ट्राँग असते, तर ते तिच्यामागे कोयता घेऊन धावणार नाहीत, पण असं घडत नाही. प्रसिद्ध विदुषी गायत्री स्पिऑक यांनी एकदा म्हटलं होतं की, दोन गोष्टी कधीच बदलू शकत नाहीत. महिलांची पुनरुत्पादन करण्याची ताकद आणि त्यांच्यातून होणारे नव्या युगाचे निर्माण.

**यात बदल होण्यासाठी काय करायला हवं, असं तुला वाटतं?**

इथल्या पुरुषांचे शिक्षण जेंडर सेन्सिटिव्ह असलं पाहिजे. मुलीला स्वत:बद्दल असलेला न्यूनगंड नष्ट केला पाहिजे. मेरी क्युरीला नोबल पारितोषिक मिळाले. जगभर अशा अनेक मेरी आहेत, त्या संशोधन करत नसतील, पण त्या संसार चालवतात. त्याबद्दल त्यांचा सन्मानच करायला हवा. आपल्याकडे जात टिकविण्याच्या हव्यासातून स्त्रीच्या लैंगिकतेवर बंधने लादली आहेत. लैंगिकतेच्या प्रति आपल्याकडे असणारी आध्यात्मिकता, शुद्ध अशुद्धतेची कल्पना दूर करायला हवी. तर तिचं खरं सामर्थ्य समोर येईल. दुसरं म्हणजे मुलींना स्वसंरक्षणाचं प्रशिक्षण द्यायला हवं. कारण लैंगिकता आणि हिंसा या दोन बाबींचा पितृसत्तेने सतत वापर केला आहे.

**आंबेडकरवादी आणि डावे यांचे अंतिम ध्येय समान असूनही ते एकत्र येताना दिसत नाहीत. जात आणि वर्गाचे प्रश्न सुटत नाहीत. काय स्थिती आहे या सगळ्याची?**

व्यक्तीचा एक सीमित अवकाश असतो. त्यात तो जे वाचतो, अनुभवतो त्यातून त्यांनी तशी मते बनविलेली असतात. बऱ्याचदा ते सम्यक आकलन असतंच असं नाही, पण आपण जेव्हा ''तू चुकतोस'' असं त्याला सांगतो तेव्हा तो आपले अनुभव सांगू लागतो. डाव्यांनी या वेळी असं केलं, तसं केलं. त्यात त्यांची चूक नाही, पण तो परिपूर्ण विचार नसतो. एक समजून घेतलं पाहिजे की, आंबेडकर विचार



> **हिंदुस्थानातील ब्राह्मणवादी दुष्ट डाव्यांमुळे हिंदुस्थानात क्रांती होऊ शकली नाही. हे लोक क्रांतीचा सिद्धांत हिंदुस्थानला लागू करण्यात कमी पडले. उलट जे क्रांती करत होते त्यांना यांनी भांडवली ठरवले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना नावं ठेवली. इथल्या मध्यमवर्गाने गरीब लोकांच्या शोषणाबद्दलचे पाऊल अद्याप उचललेले नाही.**

हा मूलतः डावा विचार आहे. डावा विचार म्हणजे काय, तर मुक्तीचा लढा, शोषणाविरुद्ध लढा. जिथे जिथे अन्याय होत असेल त्याविरुद्धचा लढा यासाठी प्रेरित करणारा विचार. मग आंबेडकरी व्यक्ती शोषणाविरुद्ध, अन्यायाविरुद्ध लढते की नाही, समतेसाठी लढते की नाही? हेही लक्षात घ्यावं लागतं. हिंदुस्थानातील ब्राह्मणवादी दुष्ट डाव्यांमुळे हिंदुस्थानात क्रांती होऊ शकली नाही. हे लोक क्रांतीचा सिद्धांत हिंदुस्थानला लागू करण्यात कमी पडले. उलट जे क्रांती करत होते त्यांना यांनी भांडवली ठरवले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना नावं ठेवली. इथल्या मध्यमवर्गाने गरीब लोकांच्या शोषणाबद्दलचे पाऊल अद्याप उचललेले नाही. यांची आंदोलनं जमिनीसाठी झाली नाहीत. यांची आंदोलनं मैला साफ करणाऱ्यांसाठी झाली नाहीत. यांची लढाई आयएएस, आयपीएससारख्या नोकऱ्यांसाठी, आंदोलने आरक्षणासाठी होतात. त्यांना मध्यमवर्गाची लढाई हवी आणि दुर्दैवाने त्यांच्याकडेच नेतृत्व आलं आहे. व्यवस्था परिवर्तनाचा आजचा लोकप्रिय कार्यक्रम काय आहे, तर चांगलं उच्च शिक्षण घ्या, बड्या पगाराच्या नोकऱ्या करा आणि नोकरी लागल्यावर समाजाची परतफेड म्हणून चॅरिटी करा, पण चॅरिटीने व्यवस्था बदलता येत नाही.

आज असंघटित क्षेत्रात ९१ टक्के दलित आहेत, जिथे आरक्षण नाही. त्यांचे आर्थिक प्रश्न गंभीर आहेत. त्यांच्या मुळाशी अर्थात जात तर आहेच. ही जात संपवायची असेल तर त्यांच्या आर्थिक प्रश्नांचीदेखील सोडवणूक करावीच लागेल. धर्मांतर ही चांगलीच गोष्ट आहे, पण केवळ धर्म बदलून परिवर्तन होणार नाही. आर्थिक सुधारणांना चळवळीने प्राथमिकता द्यायला हवी.

**दलित पँथरच्या स्थापनेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष नुकतंच संपलं. अनेकांना आजही पँथरसारखी संघटना असावी असं वाटतं. आता नव्याने असे संघटन बांधायचे तर काय करावं लागेल?**

दलित पँथर ज्या काळात कार्यरत होती, त्या काळात मध्यमवर्गाने म्हणावा तेवढा त्यांना सपोर्ट केला नाही. पुढे चळवळीला सपोर्ट करण्याची कांशीरामजी यांची 'पे बॅक टू सोसायटी' चळवळ आली, पण आता तीही राहिली नाही. समाजातील बदल संविधानाच्या मार्गातूनच आणावा लागेल. त्यासाठी वैचारिक बदलाची गरज आहे. दलित पँथरचा विचार करता एक जाणवतं की, त्यांच्याकडे वैचारिक स्पष्टता नव्हती, पण अन्यायाच्या विरुद्ध लढण्याचा जोश होता. तो त्यांनी खूप ताकदीने सिद्ध केला. सनातनांच्या हल्ल्यांना सडेतोड उत्तर दिले. चळवळ कुठलीही असो, त्याला सिद्धांताचा पाया असावा लागतो. पँथर जेव्हा कार्यरत होती, बाबासाहेबांचे संपूर्ण साहित्य उपलब्ध झालेले नव्हते. तरीही त्यांनी धाडसाने काम केलं. गुजरात, पंजाब, तामीळनाडू, मध्य प्रदेश, राजस्थान अशी ती हिंदुस्थानभर पसरली. दलित पँथर बरखास्त झाल्यावर भारतीय दलित पँथर निघाली, पण जनता दलाच्या काळात दोन गोष्टी झाल्या. जनता दलाने आरएसएसला थारा दिला आणि दलित पँथरला राजकारणात सामावून घेतले. तिथे पँथर विस्कटली. आता पँथरसारखी संघटना उभी करायची असेल तर स्ट्राँग मॉरल फोर्स पाहिजे. याच्या अभावात संघटना तयार झाली तर ती अल्पकालीन असेल. दलित पँथरसारखे नवे संघटन समाजाच्या प्रबळ नैतिक शक्तीच्या आधारावर बनवावे लागेल.

**सत्तर-ऐंशीच्या दशकात प्रभावी असणारी साहित्य, नाट्य, कला अशी जी चळवळ होती, ती आता दिसत नाही. तुला काय वाटतं?**

चळवळ अनेक आघाड्यांवर करावी लागते. त्यासाठी वेगवेगळ्या क्षेत्रांत निष्ठापूर्वक काम करणारे लागतात, पण दलित चळवळीचं असं झालं आहे की, प्रत्येक क्षेत्रात काम करणाऱ्याला आपण राजकारण करावंसं वाटतं. त्यामुळे उत्कृष्ट साहित्य निर्मिती करणारा राजकारणात आला की, त्याची लेखणी कमकुवत होते. साहित्यिकाची व्यवस्थेला धारेवर धरणारी मशाल तिथे गेली की, विझून जाते. कवी, पत्रकार, लेखक, विचारवंत, डॉक्टर्स, इंजिनीअर्स, प्रशासकीय अधिकारी यांचे जे क्षेत्र आहे, त्यात त्यांनी निष्ठेने काम करावे. अंतिमतः ते चळवळीला उपयोगी ठरते. कॅप्टन तर एकच असणार. सगळ्यांनीच कॅप्टन होऊ म्हटलं तर ते कसं शक्य होईल?

**सध्या तू कशावर लेखन करीत आहेस? तुझे पुढील प्रकल्प काय आहेत?**

प्रकाशकांशी दोन पुस्तकांचे करार केले आहेत. तीन-चार देशांत ती एकाच वेळी प्रकाशित करायची आहेत. 'कास्ट : न्यू हिस्टरी' या पुस्तकात मध्य अमेरिका, कॅनडा, उत्तर अमेरिका, युरोप येथे प्रत्यक्ष जाऊन जो अभ्यास केलेला आहे, त्यावर आधारित ते पुस्तक आहे. दुसरे पुस्तक आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चरित्र. त्याचं बरंच काम झालंय, पण ते इतक्यात पूर्ण होईल असं वाटत नाही. कांशीरामजी यांच्या निवडक लेखांचे 'कांशीराम रीडर' असेदेखील पुस्तक मी करतो आहे. दीर्घकालीन प्रकल्प म्हणाल तर आपली जी चळवळ आहे, तिला आंतरराष्ट्रीय ओळख असली पाहिजे यासाठी मी काम करतो आहे. शिवाय मला मराठवाड्याला जगात नवीन विचार देणारे केंद्र बनवायचे आहे. तसेच ऑक्सफर्ड विद्यापीठात माझे संशोधन चालू आहे. हिंदुस्थान आणि जगभर तर भ्रमंती चालू आहेच, पण हेही सांगतो, राजकारण हा माझा सध्याचा विषय नाही.

**नांदेडबद्दल तुला जे विशेष प्रेम आहे, ते तुझं गाव म्हणून तर आहे, पण त्याहून अधिक काही आहे असं तू म्हणतोस, ते काय?**

प्रगत भागात काम करून देशाची प्रगती कशी साधणार?

मला काम तिथे केलं पाहिजे जिथे आवश्यकता आहे. नांदेड ही माझी जन्मभूमी आहे. मी इथं वाढलो, शिकलो, या भूमीशी माझे ऋणानुबंध आहेत हा एक भाग तर आहेच, पण इथली जी शिकणारी मुलं आहेत– मग ती कुठल्याही जातीधर्माची असतील, त्यांच्यात मला आत्मविश्वास निर्माण करायचा आहे. आपल्या जीवनाचं तुम्ही भलं जरूर करा, पण आपल्या भागाच्या विकासाकडेही लक्ष द्या. या प्रदेशाबद्दल मनात दुरावा ठेवू नका. मराठवाड्याला इतिहासकालीन व्यापार, संस्कृती व धर्माची जी अभिमान वाटावी अशी परंपरा आहे, तो अभिमान हिरावून घेतला आहे. तो अभिमान मला परत आणायचा आहे. नांदेड, उदगीर, बीड, जालना, धाराशिव या सर्व मुलांना मला सांगायचंय की, मी तुमचाच आहे. आफ्रिकेत एक पंचावन्न कोटी वर्षांपूर्वीची वनस्पती मी पाहिली. सगळीकडे वाळवंट, कुठेच पाणी नाही. प्रचंड अभावात ही वनस्पती टिकून आहे. तसंच या मराठवाड्यातील खडकाळ प्रदेशातूनच या देशाचं भवितव्य घडेल असं मी स्वप्न पाहतो आहे.

**सूरज, तू आजच्या तरुणांचा आयकॉन आहेस. तुला फॉलो करणाऱ्या तरुणाईला तू काय सांगशील?**

तुम्ही सर्वप्रथम स्वतःच्या पायावर उभे रहा, कुटुंबाकडे लक्ष द्या, पण मग त्यातच अडकून पडू नका. समाज जीवनात खुलेपणाने वावरा, खूप अनुभव घ्या. खरे-खोटे काय, विवेकाने समजून घ्या. सर्वात महत्त्वाचं म्हणजे स्वतः मधला स्वाभिमान सतत जिवंत ठेवा. वेळप्रसंगी कठोर भूमिका घ्यायला तुम्ही तयार राहा. मग ती भूमिका कुटुंबीयाच्या विरुद्ध असो किंवा मित्राच्या विरोधात असो. प्रवासाला आपल्या जीवनाचं अभिन्न अंग बनवा. एकांगी विचारातून प्रगती होत नसते. आपलं मन सदैव खुलं ठेवा. सतत एकाच विचारांच्या लोकांची संगती करू नका. नवे विचार, नवे दृष्टिकोन समजून घ्या. आपण एखाद्या विचाराशी सहमत नसू तर त्यांना एकदम शत्रू करू नका. सर्वांप्रतीचा मानवी दृष्टिकोनच हे जग सुंदर करू शकतो, यावरचा विश्वास कधीच ढळू देऊ नका.

(मुलाखतकार स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या माध्यमशास्त्र संकुलाचे संचालक आहेत.)

• • •

तुमच्यासाठी योग्य रत्ने आमच्याकडे मिळतील
शिवकीर्ति ज्वेलर्स
स्नेहसबंधाचा सोनेरी दुवा
सोने व हिरे यांचे व्यापारी



विलेपार्ले (पूर्व), मुंबई
संपर्क : २६१६९९३३ / २६१६९९४४